Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# महंत ते मॅनेजर्स

30 Sep 2011, 0458 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

समर्थ रामदासस्वामींनी १७व्या शतकात आपल्या लेखनातून केलेला उपदेश हा आजच्या काळातील व्यवस्थापन-शास्त्राशी समांतर आहे. तेव्हाची सामाजिक, राजकीय, धामिर्क परिस्थिती पाहून गांजलेल्या समाजाला जागृत करण्यासाठी रामदासस्वामींनी जो उपदेश केला तो काळाच्या कसोटीला उतरला आहे. म्हणूनच तेव्हा महंत निमिर्तीसाठी रामदासस्वामींनी जे सांगितले आहे ते आजच्या मॅनेजर्सना लागू पडणारे आहे. तेव्हा रामदासांनी आत्मसुखासाठी, परमेश्वरप्राप्तीसाठी केलेला उपदेश आज ग्राहकसुखासाठी उपयोगी पडणारा आहे. तेव्हा समर्थांना संपूर्ण समाजाचे उत्थापन करेल आणि परकीयांच्या जुलमाखाली दडपलेल्या समाजाला नवे जीवन देईल असे नेतृत्व अपेक्षित होते. आता कोणत्याही क्षेत्रातले नेतृत्व हे अनेकदा परिश्रमपूर्वक घडवावे लागते. आजच्या व्यवस्थापन-शास्त्रात प्रशिक्षणावर भर दिलेला आहे. प्रभावी नेतृत्वासाठी सत्ता असून उपयोग नसतो, त्यासाठी हवे असते लोकांचे, कार्यर्कत्यांचे सहकार्य. हे कसे मिळते तर, जो मानला बहुतांसी/ कोणी बोलो न शके त्यांसी। तो परोपरकार करिता गेला। पाहिजे तो ज्याला त्याला। मग काय उणे तयाला।. भूमंडळी।। एखादा नेता जनतेच्या पाठीशी उभा राहिला, नेहमी लोकांना मदत करत गेला की अशा नेत्याला लोक मनापासून मानतात.

नेता मग तो राजकीय पक्षाचा असो वा कंपनीतला व्यवस्थापक असो जेव्हा आपल्या कर्मचाऱ्यांतून सहकारी निर्माण करतो तेव्हा तो खऱ्या अर्थाने नेता ठरलेला असतो. ही किमया करण्यासाठी व्यवस्थापकाने किंवा नेत्याने स्वत:चा अहंकार बाजूला सारला पाहिजे. रामदासस्वामी सांगतात- अहंतागुणे सर्व ही दु:ख होते। मुखे बोलिले ज्ञान ते व्यर्थ जाते। जेव्हा नेतृत्व अहंकारी असते, तेव्हा त्यातून भेदभाव निर्माण होतो, या भेदातून भय उत्पन्न होते, भयातून अकार्यक्षमता जन्माला येते आणि अंतिम नुकसान त्या आस्थापनाचे वा पक्षाचे होते. अनेकदा जसजसा माणूस वरच्या पदाला जातो तसतसे त्याला वाटू लागते की, आपण करतो ते सारेच बरोबर असते, चूक असते ती आपल्या कनिष्ठांची. म्हणून रामदासस्वामी सांगतात, उपाधीस विस्तरावे। उपाधींत न सापडावे। नीचत्व पहिलेंच घ्यावे। आणि मूर्खपणा।। म्हणजेच चांगला नेता स्वत:च्या पदाच्या उपाधींमध्ये न अडकता, झालेल्या चुका, कमीपणा अगदी मूर्खपणाही स्वत:कडे घेतो. त्यामुळे त्याच्या अधिकारपदाची कक्षा विस्तारते. सहकाऱ्यांना त्याच्या-बद्दल विश्वास वाटतो आणि अधिक सावधपणे काम करून यशस्वी होण्यासाठी ते प्रयत्न करतात.

मात्र हे सांगतानाच लोक पारखून घ्यावे। राजकारणें अभिमान झाडावे। पुन्हा मेळवून घ्यावे। दुरिल्यां दोरें।। म्हणजे आपल्याच पक्षातील, कंपनीतील जे लोक सत्तेने, संपत्तीने उन्मत्त झालेले असतील त्यांचा हा गर्व मोडून काढावा. त्यांची जागा त्यांना दाखवून दिल्यानंतर काही काळाने त्यांना पुन्हा आपल्या कार्यात सामावून घ्यावे, हे सांगायला रामदासस्वामी विसरत नाहीत.

रामदासांनी सांगितलेली ही सूत्रे त्यांना अभिप्रेत असलेल्या महंतांप्रमाणे आजच्या काळातील मॅनेजर्सना उपयोगी पडणारी आहेत.

- डॉ. सुधीर निरगुडकर
.............

डॉ. सुधीर निरगुडकर हे व्यवस्थापन तज्ज्ञ आणि 'एक असतो बिल्डर,' 'समर्थ रामदासांची व्यवस्थापन नीती' व 'राजमार्ग यशाचा' या पुस्तकाचे लेखक आहेत.

Network Access Message: The page

Tweet या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768